# Pimpri Chinchwad Police Commissionerate

## प्रेसनोट

## गुन्हे शाखा युनिट 3 ची कामगिरी

## रेकॉर्डवरील मोटर सायकल चोराकडून कि.रु. 07,55,000 रुपयांच्या 11 स्पोर्ट बाईक/मोटर सायकली जप्त

दिनांक 27/12/2020 रोजी गुन्हे शाखा,युनिट 3 कडील प्रसन्न जऱ्हाड पोलीस उप निरीक्षक व पोलीस उप निरीक्षक गिरीश चामले हे स्टाफसह खाजगी वाहनाने चाकण पोलीस ठाणेचे हददीत गुन्हे प्रतिबंधात्मक पेट्रोलिंग करीत असताना पो.शि. 2478 ढाकणे व पो.शि.1281 कोळेकर यांना त्यांचे बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, रेकॉर्डवरील गुन्हेगार इसम नामे प्रतिक टावरे हा त्याचे आणखी 03 साथीदारांसह चोरीच्या दोन मोटार सायकलीं चाकण येथे विक्री करीता येणार आहे. वगैरे मजकुराची खबर मिळताच मा.वरिष्ठांच्या आदेशाने व मार्गदर्शनाखाली पोलीस स्टाफ व सह मेदनकरवाडी फाटयासमोर, शिक्रापुर चाकण रोडवर, चाकण, ता. खेड, जि. पुणे येथे सापळा रचुन इसम नामे 1) प्रतिक मच्छिंद्र टावरे, वय 19 वर्षे, रा. इंडियन ऑईल पंपाचेमागे खराबवाडी, चाकण, मुळगाव :- अवसरी बुाा टावरेवाडी, ता. आंबेगाव, जि. पुणे 2) हरीभाऊ दत्ता जाधव, वय 39 वर्षे, रा. मु.पो. वाडे बोल्हाई, ता.हवेली, जि. पुणे मुळगाव :- मु.भुसे, पो. म्हाळसा कोरे, ता. निफाड, जि. नाशिक 3) नासिर मोहमद शेख, वय 50 वर्षे, रा. महाळुंगी फाटा, निमगाव, ता. शिरुर,जि. पुणे मुळगाव :-मु.पो.कचगाव तेडव्हा, ता.मडयाहु, जि. जौनपुर, उत्तर प्रदेश व एक विधीसंघर्षीत बालक यांना ताब्यात घेवून त्यांचे विरुध्द सीआरपीसी 41 (1)(ड) प्रमाणे कारवाई करुन तसेच त्यांचेकडे अधिक तपास केला असता त्यांनी विविध ठिकाणी महागडया किंमतीच्या मोटर सायकली चो-या केल्याचे कबुल करुन त्यांचेकडून एकुण 11 मोटर सायकल किंमत रुपये 7,55,000/- रु.च्या जप्त करण्यात आलेल्या आहेत.

आरोपींनी सदर मोटर सायकली बाबत पिंपरी चिंचवड आयुक्तालय, पुणे आयुक्तालय, पुणे ग्रामीण जिल्हा, सोलापुर ग्रामीण जिल्हा येथे चो-या केल्या असून त्या संदर्भात खालील प्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

म्हाळुंगे पोलीस चौकी – 01, दिघी पोलीस ठाणे – 01, भोसरी पोलीस ठाणे – 01, भोसरी एमआयडीसी – 02, दत्तवाडी पोलीस ठाणे – 01, रांजणगांव पोलीस ठाणे – 02, शिक्रापुर पोलीस ठाणे-01, खेड पोलीस ठाणे – 01, टेंभुर्णी पोलीस ठाणे – 01

**(रेकॉर्डवरील गुन्हेगार प्रतिक मच्छिंद्र टावरे याचेवर यापुर्वी मोटर सायकल चोरीचे 02 गुन्हे दाखल आहेत)**

**सदरची कारवाई ही मा. पोलीस आयुक्त, श्री. कृष्ण प्रकाश, मा. अपर पोलीस आयुक्त श्री.रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री. सुधिर हिरेमठ, मा. सहा पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री.आर.आर. पाटील यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक शंकर बाबर, सहायक पोलीस निरीक्षक सतिश कांबळे, प्रसन्न ज-हाड पोलीस उपनिरीक्षक, पोलीस उप निरीक्षक गिरीश चामले, हजरत पठाण, यदु आढारी, नाथा केकाण, सचिन मोरे, विठठल सानप, गंगाधर चव्हाण, योगेश्वर कोळेकर, महेश भालचिम, राजकुमार हनमंते, सागर जैनक, त्रिनयन बाळसराफ, एस.डी.नांगरे, राहुल सुर्यवंशी, प्रमोद ढाकणे व गजानन आगलावे यांनी केली आहे.**


महाराष्ट्र पोलीस


पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय